महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
सोलापूर विभाग,सोलापूर. रा.प.विभागीय कार्यालय,बुधवार पेठ,सोलापूर
४१३ ००२
दुरध्वनी क्र ०२१७-२७३३३३२ ई मेल - msrtcslp@gmail.com

जाक्र/राप/विनिसो/वाह/वाणिज्य/ १४४८० . दिनांक : २७.०४.२०२६

## ई- निविदा सुचना क्रमांकः- ०१/२०२६

विभाग नियंत्रक महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ सोलापूर विभाग , सोलापूर हे पंढरपूर येथील चंद्रभागा बसस्थानकावरील व चंदभागा यात्री निवास येथे नव्याने तयार झालेल्या एकुण रिक्त ०६ बांधीव गाळयांकरिता, तसेच डॉरमेटरी क.१ मधील ०५ रुमकरीता व डॉरमेटरी क.०२ मधील ०६ रुमकरीता वााणिज्य आस्थापनांनूसार "निवडक व आवडेल तो व्यवसाय" या तत्वावर मासिक परवाना शुल्कावर लिव्ह अॅण्ड लायसेन्स पध्दतीने चालविण्यांस देण्यासाठी ई निविदा पध्दतीने निविदा मागवित आहेत.

निविदा फॉर्म फी (वस्तू व सेवाकरा सहीत) व बयाणा रक्कम ही ऑन लाईन **"पेमेंट गेट वे"** पध्दतीने भरावयाची आहे. ई-निविदा सादर करताना दोन लिफाफा पध्दत वापरण्यात यावी.पहिल्या लिफाफयामध्ये तांत्रिक निविदा व दुस-या लिफाफयामध्ये आर्थिक निविदा सादर करणे अनिर्वाय आहे. तांत्रिक व आर्थिक निविदा एकत्र सादर केल्यास निविदाकारास अपात्र करण्यात येईल. त्यामुळे निविदा सादर करते वेळी, काळजीपूर्वक निविदा सादर करावी.

रा.प.सोलापूर विभागातील चंद्रभागा बसस्थानक पंढरपूर येथील बसस्थानकावरील तळ मजल्यावर तयार झालेल्या ०४ बांधीव गाळे, तसेच चंदभागा यात्री निवास येथील तळमजलयावर ०२ बांधीव गाळे व चंदभागा यात्री निवास येथील पहिल्या मजल्यावर तयार झालेल्या डॉरमेटरी क.०१ मधील ०५ रुम करीता तसेच डॉरमेटरी क.०२ मधील ०६ रुमकरिता, प्रवाशी जनतेच्या सोईकरिता "निवडक व आवडेल तो व्यवसाय" या तत्वावरवाणिज्य आस्थापना कार्यान्वित करण्याकरिता ई-निविदेद्वारे अधिकृत परवानाधारकाची नियुक्ती करण्याबाबत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे.सदर ई-निविदेचा निविदा कार्यक्रम व वेळापत्रक पुढीलप्रमाणे :-

| अ.क्र. | प्रक्रीया | सुरू होण्याची तारीख | | बंद होण्याची तारीख | |
|---|---|---|---|---|---|
| | | तारीख | वेळ | तारीख | वेळ |
| १ | निविदा प्रसारित करणे | ३०.०४.२०२६ | ११.०० वा | | |
| २ | निविदा प्रपत्र डाऊनलोड करणे. | ३०.०४.२०२६ | ११.०० वा | २५.०५.२०२६ | १५.०० वा |
| ३ | निविदा भरणे | ३०.०४.२०२६ | ११.०० वा | २५.०५.२०२६ | १५.०० वा |
| ४ | तांत्रिक निविदा उघडणे | २८.०५.२०२६ | ११.०० वा | | |
| ५ | आर्थिक निविदा उघडणे | तांत्रिक निविदा तपासणी पूर्ण झाल्यानंतर कळविण्यात येईल. | | | |

**ई-निविदेच्या तांत्रिक लिफाप्यामध्ये निविदा फॅार्म नमुना "अ" पुर्णतः भरुन त्यावर फोटो लावुन, स्वाक्षरी करुन, फॉर्म स्कॅन करुन अपलोड करावा व त्या सोबत पुढील कागदपत्रे स्कॅन करुन जोडावेत.**

१. वर्तणुकीचा / चारित्र्याचा दाखला. (निविदाकार त्यांचे चारित्र्य चांगले असल्याबाबतचा सरपंच किंवा नगरसेवक किंवा विशेष कार्यकारी दंडाधिकारी (एस.ई.ओ.) यांचा निविदाकाराच्या फोटोसह दाखला निविदा फार्मसोबत जोडतील.)



Scanned with OKEN Scanner

२. स्थावर मालमत्ता :- निविदाकाराच्या नावे असलेल्या घराची स्थानिक स्वराज्य संस्थेस चालू आर्थिक वर्षाची कर अदा केलेल्या पावती किंवा शेत जमिनीचा ७/१२, (निविदा पति किंवा पत्नीच्या नावे सादर केल्यास स्थावर मालमत्ता निविदाकाराची पत्नी किंवा पतीच्या नावे असल्याचे, रु.५००/- च्या मुद्रांक शुल्कावर कागदावर प्रतिज्ञापत्र सादर केल्यास ते स्विकारण्यात येईल. तसेच निविदा संस्थेच्या / फर्मच्या नावे भरल्यास आवश्यक असणारे सर्व कागदपत्रे संचालकांच्या किंवा भागीदारांच्या नावे असणे क्रमप्राप्त राहील. )

३. जंगम मालमत्ता :- निविदाकाराच्या स्वत:च्या नांवे, ट्रक, टेम्पो, ट्रॅक्टर, जीप, इत्यादि जंगम मालमत्ता :-जर निविदाकाराच्या नावे सदरची जंगम मालमत्ता नसल्यास, निविदाकाराच्या आई /वडिल / पत्नी / भावाच्या नावावर असल्यास, निविदाकाराच्या हिश्श्याबाबतचा स्पष्ट उल्लेख असलेले ॲफिडेव्हीट त्यांनी सादर करणे आवश्यक आहे. (निविदाकाराने निविदा पति किंवा पत्नीच्या नावे सादर केल्यास जंगम मालमत्ता पत्नी किंवा पतीच्या नावे असल्याचे, रु.५००/- च्या मुद्रांक शुल्कावर कागदावर प्रतिज्ञापत्र सादर केल्यास ते स्विकारण्यात येईल. तसेच निविदा संस्थेच्या / फर्मच्या नावे भरल्यास आवश्यक असणारे सर्व कागदपत्रे संचालकांच्या किंवा भागीदारांच्या नावे असणे क्रमप्राप्त राहील. )

४. निविदाकार ज्या व्यवसायाकरिता निविदा सादर करत आहे त्या व्यवसायासाठी आवश्यक असलेले वसंबंधित सक्षम प्राधिकारणाने निर्गमित केलेले वैध मुदतीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. (उदा. महा ई सेवा केंद्र- किऑक्स आयडी, बेकरी शॉप - अन्न व औषध प्रशासनाचा दाखला, दवाखाना- सक्षम प्राधिका-यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र, मेडिकल - बी फार्म/ डी फार्म चे प्रमाणपत्र इत्यांदी) तसेच संबंधीत केंद्राचे सर्व दस्ताऐवज व रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर स्व -घोषणापत्र देणे बंधनकारक राहील.

५. निविदा संस्थेच्या / फर्मच्या नावे भरल्यास संस्थेच्या / फर्मच्या संचालक मंडळाची व भागीदारांची यादी.

६. निविदाकाराकडे रा.प.महामंडळाची कोणतीही थकबाकी नाही याबाबतचे तसेच निविदाकारास रा.प.महामंडळाने / शासकीय / निमशासकीय / महामंडळे / इतर राज्य परिवहन उपक्रमाने निविदाकाराचे नाव काळ्या यादीत समाविष्ठ केले नाही, याबाबतचे रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र.

७. दोन जामिनदारांचे निविदा फॉर्म सोबत (रु.५००/-च्या स्टॅम्प पेपरवर नमुन्यातील) संमतीपत्र, त्यांचे स्वत:चे घर, शेती व इतर स्थावर / जंगम मालमत्ता असल्याचे चालू उतारे व संबंधित मालमत्तेकरिता चालू आर्थिक वर्षामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेकडे भरणा केलेल्या कराची पावती.

८. पॅनकार्डची प्रत.

९. पोलिस दाखला (पोलिस आयुक्त किंवा पोलिस अधिक्षक यांचेकडून मिळविलेला गुन्हा नोद नसलेला व निविदा सादर करावयाच्या दिनांकापर्यत ०६ महिन्याच्या आतील असावा ) (सदर दाखले स्कॅन करुन पीडीएफ फॉर्मेटमध्ये अपलोड करावे).

संबंधित व्यवसायाकरिता आवश्यक असणारे सर्व परवाने घेण्याची जबाबदारी निविदाकाराची राहील.कोणताही निविदा अर्ज कोणतेही कारण न देता स्वीकारण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार रा.प.महामंडळ राखून ठेवीत आहे.**रा.प.महामंडळाच्या नियम /अटी मध्ये वेळोवेळी होणारे बदल परवानाधारकावर बंधनकारक राहतील.निविदा रद्द करण्याचे किंवा त्यामध्ये दुरुस्ती करण्याचे अधिकार रा.प.महामंडळ राखून ठेवीत आहे.** तसेच निविदा प्रक्रिये दरम्यान निविदाकाराने सादर केलेल्या कागदपत्राची सत्यता पडताळणी करता मुळ पत्राची आवश्यकता वाटल्यास रा.प.महामंडळाने मागणी केल्यानंतर तांत्रिक निविदेसोबत सादर केलेल्या कागदपत्राची मुळ प्रत महामंडळास सादर करणे निविदाकारास बंधनकारक राहील.निविदा प्रक्रियेचा सर्व खर्च निविदाकाराने सोसावयाचा आहे.

**ई-निविदेच्या तांत्रिक लिफाप्यामध्ये उक्त सर्व कागदपत्रके सादर केल्यानंतर, निविदा फॉर्म नमुना "ब" आर्थिक निविदेचा (BOQ प्रारूपामधील) नमुना पुर्णत: भरुन स्वाक्षरी करुन, फॉर्म स्कॅन करुन अपलोड करावा.**

**रा.प.पंढरपूर चंदभागा बसस्थानक व चंदभागा यात्री निवास बसस्थानकावरील वाणिज्य आस्थापना/ उपलब्ध गाळ्यांचा तपशील पुढीलप्रमाणे:-**



Scanned with OKEN Scanner

| चंदभागा बस्थानकावरील नव्याने तयार झालेल्या व्यावसायिक गाळयांचा तपशील | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| तळमजला - एकुण ०४ गाळे | | | | | | |
| अ. क्र. | गाळा क्र. | गाळ्याची स्थिती | एकुण क्षेत्रफळ चौ. फुट | रा.प.महामंडळाची अपेक्षित रक्कम रुपये | बयाणा रक्कम रुपये | शेरा |
| १ | ८ | तळमजला | २३२.६३ | ८०००/- | ९६०००/- | |
| २ | १० | तळमजला | २५१.८९ | ८५००/- | १०२०००/- | |
| ३ | ११ | तळमजला | ४१७.७० | १५०००/- | १८००००/- | दवाखाना किंवा कार्यालयाकरीता [पाटीशियन व स्वतंत्र प्रसाधनगृहासह] |
| ४ | १२ | तळमजला | १४९४.१३ | ४७००६/- | ५,००,०००/- | उपहारगृहाकरीता [किचन व युटीलिटी रुमसहित] |

| चंदभागा यात्री निवास इमारतीमधील नव्याने तयार झालेल्या व्यावसायिक गाळयांचा तपशील | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| तळमजला - एकुण ०२ गाळे | | | | | | |
| अ. क्र. | गाळा क्र. | गाळ्याची स्थिती | एकुण क्षेत्रफळ चौ. फुट | रा.प.महामंडळाची अपेक्षित रक्कम रुपये | बयाणा रक्कम रुपये | शेरा |
| १ | ९ | तळमजला | २७६.३१ | ९०००/- | १०८०००/- | |
| २ | १० | तळमजला | १९१६.४६ | ६०२९२/- | ५०००००/- | उपहारगृहाकरीता [किचन व युटीलिटी रुमसहित] |

| पहिला मजला एकुण ११ स्वतंत्र रुम मधील डॉरमेटरीकरीता | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ क | रुम क. | आस्थापना | क्षेत्रफळ चौ.फुटामध्ये | रा.प.महामंडळाची अपेक्षित रक्कम रुपये | बयाणा रक्कम रुपये | शेरा |
| १ | १ | डॉरमेटरी क.०१ | १५४५.१३ | ३६१६६९/- | ५०००००/- | स्वतंत्र १ कार्यालय,टेरेस व लॉबीस्पेस सह, १३ बाथरुम, २३ टॉयलेट व ९ युरिनलसह [एकुण क्षेत्रफळ ५१७९.८६चौ.फुट |
| | २ | | १३७७.४७ | | | |
| | ३ | | ६८७.०२ | | | |
| | ४ | | ७५६.३२ | | | |
| | ५ | | १९५०.३५ | | | |
| | ६ | डॉरमेटरी क.०२ | २७७२.५२ | ४५२६७३/- | ५०००००/- | स्वतंत्र १ कार्यालय,टेरेस व लॉबीस्पेस सह, १३ बाथरुम, २३ टॉयलेट व ९ युरिनलसह [एकुण क्षेत्रफळ ५२१५.८६चौ.फुट |
| | ७ | | ७५७.५० | | | |
| | ८ | | १३८१.०४ | | | |
| | ९ | | १५५१.१६ | | | |
| | १० | | १९५५.५२ | | | |
| | ११ | | ७५५.२४ | | | |



Scanned with OKEN Scanner

**उक्तप्रमाणे तयार झालेल्या गाळयांमध्ये खालीलप्रमाणे व्यवसाय करण्याची संधी महामंडळामार्फत उपलब्ध करुन देण्यात येत आहे.**

| व्यवसाय अनुसूची | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | व्यवसाय | अ.क्र. | व्यवसाय | अ.क्र. | व्यवसाय |
| १. | विविध शासकीय अथवा खाजगी कार्यालये | १० | विविध वस्तुंचे शोरुम | १९ | फुट वेअर शोरुम |
| २ | राष्ट्रीयकृत व खाजगी बँक कार्यालय | ११ | ज्वेलरी/इमिटेशन ज्वेलरी शॉप | २० | टुव्हीलर /ॲटो स्पेअर पार्ट शोरुम |
| ३ | औषधी दुकाने (जनऔषधी व्यतिरिक्त) | १२ | रेडिमेड वेअर, होलसेल साडी, कपडा, चिल्ड्रन्स वेअर शोरुम | २१ | गिफ्ट सेंटर |
| ४ | दवाखाना /पॅथॉलॉजी लॅब | १३ | बेकरी शॉप | २२ | सायबर कॅफे, झेरॉक्स, टायपिंग सेंटर |
| ५ | पिझ्झा / डॉमिनोज / इंटरनॅशनल स्तरावरील फास्ट फुड सेंटर | १४ | मोबाईल अँण्ड ॲक्सेसरीज शोरुम | २३ | सनदी लेखापाल/ कायदे विषयक सल्ला कार्यालय |
| ६ | ब्युटी पार्लर, स्पा कॉस्मॅटिक सेंटर, सलून | १५ | इलेक्ट्रॉनिक वस्तुचे शोरुम | २४ | हार्डवेअर |
| ७ | मिनी सुपर मार्केट | १६ | ऑप्टिकल शॉप | २५ | दुचाकी वाहनतळ |
| ८ | फास्ट फुड व ब्रॅंडेड चहा -कॉफी सेंटर | १७ | विविध खेळण्यांचे दुकान | | |
| ९ | आईस्क्रिम /ज्युस/ कोल्ड्रींक्स पार्लर | १८ | शेती औजारे, बियाणे व किटकनाशक औषधे | | |

**टिप :- वरील वाणिज्य आस्थापना प्रकार हे केवळ उदाहरणार्थ देण्यात आले आहेत. नियमाने प्रतिबंधीत नसणारे व नियमाने महामंडळाच्या व प्रवासांच्या हितास बाधा नसणारे तत्सम व्यवसाय करण्याकरीता परवानागी देण्यात येईल.**

**विशेष टिप :-**

१. उपरोक्त प्रमाणे तयार असलेल्या बांधिव गाळयांकरिता अधिकृत परवानाधारकाची "निवडक व आवडेल तो व्यवसाय" या तत्वावर मासिक परवाना शुल्कावर लिव्ह अँण्ड लायसेन्स पध्दतीने चालविण्यांस देण्यासाठी ई-निविदा पध्दतीने निविदा मागवित आहेत. सदर निविदेमध्ये रा.प.महामंडळामार्फत यशस्वी निविदाकारास केवळ बांधिव गाळे उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. याव्यतिरिक्त महामंडळ कोणत्याही बाबींची पुर्तता यशस्वी निविदाकारास करणार नाही.

२. **परवानाधारकास निवडक व आवडेल तो या तत्वावर व्यवसाय करावयाचा असल्याने त्यांना शासनाने/ कायद्याने / रा.प. महामंडळाने प्रतिबंधित केलेला व नियमाने महामंडळाच्या व प्रवासांच्या हितास बाधा असणारे कोणताही व्यवसाय/ वस्तुची विक्री/ सेवा बारामती बसस्थानकावर करता येणार नाही.** (उदा.फटाके, मदयविक्री केंद्र, खाजगी ट्रॅव्हल्र्स व बसेसचे आरक्षण केंद्र, तबांखु व तंबाखुजन्य पदार्थ विक्री केंद्र तसेच अनधिकृत पदार्थ/वस्तू इत्यांदी)

३. एका निविदाकाराच्या नावे कमाल ०२ आस्थापना देण्यात येईल. एखाद्या निविदाकारास निविदा प्रक्रियेअंती यशस्वी उच्चतम निविदाकार म्हणून दोन पेक्षा जास्त आस्थापनांकरिता नियुक्ती झाल्याससंबंधित परवानाधारकास त्याच्या इच्छेनुसार केवळ ०२ आस्थापना देण्यात येतील. इतर वाणिज्य आस्थापनांकरिता त्यांनी सादर केलेली निविदा रद्द करून त्याची बयाणा रक्कम परत करण्यात येईल व रद्द करण्यात आलेल्या निविदेमध्ये द्वितिय उच्चतम निविदाकारास उच्चतम निविदाकाराएवढा आर्थिक देकार देण्यास तयार असल्यास, त्याची नियुक्ती करण्यात येईल. (कोणत्याही परिस्थितीमध्ये एका निविदाकारास कमाल दोनच आस्थापना देण्यात येतील.)

४. निविदाकाराने निविदा सादर करण्यापुर्वी प्रत्यक्ष बसस्थानकास भेट देऊन निविदा सादर करणेत्यांच्या हिताचे आहे. आवश्यकता भासल्यास संबंधित आगार व्यवस्थापक किंवा विभागिय वाहतुक अधिकारी रा.प. सोलापूर विभाग यांच्याशी अथवा मध्यवर्ती कार्यालयाशी संपर्क साधुन शंकेचे निरसन करुन घेऊन निविदा सादर करणे अपेक्षित आहे. कोणत्याही परिस्थितीत निविदा सादर केल्यानंतर अथवा यशस्वी निविदाकार म्हणुन निवड झाल्यानंतर पुढील सर्व कार्यवाही सामान्य स्थायी आस्थापना आदेश क्र.११९९ /२००८,दि.०३/०३/२००८ मधील व महामंडळाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकीय सुचनेच्या अधिन राहुन करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.



Scanned with OKEN Scanner

५. **एकसारखा व्यवसाय इतर गाळेधारकांनी केल्यास याबाबत महामंडळाकडे कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही.** मात्र उक्त अनुसुचीमध्ये नमुद असलेला कोणताही एक व्यवसाय गाळे परवानाधारक म्हणून निवड झालेनंतर नियुक्तीपुवी रा.प.महामंडळास करण्याबाबतचे हमीपत्र सादर करावे लागेल. व सदरचा व्यवसाय किमान ०१ वषे कालावधीकरीता बदल करता येणार नाही. तसेच सदर व्यवसाय बदल करणेपुवी रा.प.महामंडळाची पुर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

६. सर्व आस्थापनांमधुन केवळ नाथजल नाममुद्रेची पाणी बाटली विक्री करण्याचे बंधन सर्व आस्थापनाधारकांवर राहील.

७. सर्व प्रकारच्या आस्थापना तसचे डॉरमेटरी हॉलचे देखभाल व दुरुस्ती / इतर सर्व कामे करण्याची जबाबदारी संबंधित परवानाधारकाची राहील.

**निविदा सादर करताना पुढील बाबी लक्षात घ्याव्यात:-**

१. सर्व इच्छुक निविदाकारांनी निविदा डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी निविदा प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर enroll करणे आवश्यक आहे.

२. निविदाकारास निविदेचीअधिक माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळ"Bidders Manual Kit" मध्ये उपलब्ध आहे.

३. पंढरपूर येथील चंद्रभागा बसस्थानकावरील तसेच चंद्रभागा यात्री निवास येथील वाणिज्य आस्थापनांचा मासिक परवाना शुल्कावर (फी वर) लिव्ह अ‍ॅण्ड लायसेन्स पध्दतीने चालविण्यांस देण्यासाठी ई-निविदा पध्दतीने निविदा मागवित आहेत. सदर ई-निविदा दोन पाकीट पध्दतीने राबविण्यात येत आहे. पहिली तांत्रिक ई-निविदा लिफाफा व दुसरी आर्थिक ई-निविदालिफाफा.ई-निविदेमध्ये सहभागी निविदाकारांचा प्रथमत: तांत्रिक ई-निविदालिफाफा उघडण्यात येईल. सदर तांत्रिक ई-निविदामध्ये सादर केलेल्या सर्व कागदपत्रांची छाननी, निविदा समिती मार्फत करण्यात येईल व केवळ तांत्रिकदृष्टया पात्र असलेल्या निविदाकाराचा आर्थिक निविदा लिफाफा उघडण्यात येईल. आर्थिक देकारामध्ये रा.प.महामंडळास जो जास्त देकार देवू करेल, त्याला यशस्वी निविदाकार म्हणून घोषीत करण्यात येईल. तांत्रिक ई-निविदा लिफाफामध्ये आर्थिक ई-निविदा सादर करणा-या निविदाकाराची निविदा रद्द करण्यात येईल.

४. एकाच बसस्थानकावर एकाच प्रकारच्या एकापेक्षा जास्त वाणिज्य आस्थापना चालविण्यास देण्याचे अधिकार रा.प.महामंडळास राहातील.

५. निविदा अर्जावर निविदाकाराचा फोटो स्कॅन करुन लावणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे ऑनलाईन पध्दतीने निविदा अर्जाची रुपये ५,४००/- (निविदा प्रपत्र रक्कम रु.५,४००/- व १८% वस्तू व सेवाकर) शासनाच्या बदलणा-या नियमाच्या कर धोरणास अधिन राहुन निविदा फॉर्म सादर करावा लागेल.

६. व्यवयसायाकरीता आवश्यक असणा-या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थाची परवानगी घेण्याची तसेच सर्व करांची भरणा करण्याची जाबाबदारी परवानाधारकाची स्वत:चीच राहील.

७. रा.प.महामंडळाने देण्यात येणा-या जागेमध्येच व्यवसाय करावा लागेल. याव्यतिरिक्त कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम/ बदल परवानाधारकास करता येणार नाही.

८. मोकळया जागेतील वाणिज्य आस्थापना स्टॉलची बसस्थानकांवरील जागा कोणत्या जागी द्यावयाची या बाबतचे अधिकार रा.प.महामंडळाने राखुन ठेवले आहे. मोकळया जागेतील वाणिज्य आस्थापना/ स्टॉलची बसस्थानकावरील जागा रा.प. महामंडळ ठरवून देईल त्या ठिकाणीच व्यवसाय करणे बंधनकारक राहील.

९. कोणत्याही वेळी निविदा रद्द करण्याचे अधिकार विभाग नियंत्रक रा.प.सोलापूर यांना राहतील व त्याबाबत निविदाकारास खुलासा करावयाचे बंधन रा.प.महामंडळास असणार नाही.

१०. रा.प.पंढरपूर येथील चंदभागा बसस्थानकांवरील व चंद्रभागा यात्री निवास येथील वाणिज्य आस्थापनांकरिता लिव्ह अ‍ॅण्ड लायसन्सवर चालविण्यास देण्यासाठी परवानाधारकाच्या निवडीकरिता ही निविदा आहे. सदर परवाना प्रथम ५ वर्षांकरिता देण्यांत येईल. ५ वर्षांच्या कालावधीनंतर जर परवानाधारकाची सेवा समाधानकारक असेल, त्याच्याविरुध्द प्रवाशांच्या तक्रारी नसतील तर सदर परवाना पुढे प्रत्येक वर्षी वाढविण्यांत येईल. अशा कमाल ४ मुदतवाढी देण्यांत येतील व परवान्याचा एकूण कमाल कालावधी ९ वर्षांचा राहील. ५ वर्षांच्या कालावधीनंतर मुदत वाढ देतांना प्रत्येक वर्षी मागील वर्षाच्या परवानाशुल्काच्या



Scanned with OKEN Scanner

१० % रक्कम वाढविण्यांत येईल व त्याप्रमाणे प्रत्येक वर्षी परवाना शुल्काची आकारणी करण्यांत येईल.
व्यवसाय करण्याच्या जागेचा क्षेत्रफळ निविदेत उल्लेख केल्याप्रमाणे राहील.

११. प्रतिबंधित वस्तू / पदार्थ विक्री न करण्याचे बंधन परवानाधारकास राहील. महामंडळाने ब्रॅन्डींग केलेल्या वस्तू महामंडळाने निश्चित केलेल्या दराने विक्री करणे अनिवार्य राहील.

१२. परवानाधारकास देण्यात येणा-या बांधीव गाळयाव्यतिरिक्त गाळयासमोरील इतर अतिरिक्त जागा वापरण्यास परवानगी देण्यात येणार नाही. बांधीव गाळयासमोरील मोकळी जागा अनधिकृतपणे वापरल्यास, सदर आस्थापनाधारकाचा परवाना तात्काळ प्रभावाने रद्द करण्यात येईल.

१३. निविदाकारास निविदा सादर करताना आवश्यक त्या डिजीटल प्रमाणपत्र (Digital Signature Certificate )व्दारे निविदा सादर करणे बंधनकारक आहे.

१४. निविदा प्रपत्र शुल्काची रक्कमेचा परतावा महामंडळामार्फत करण्यात येणार नाही.

१५. निविदाकाराने निविदा सादर करताना अदा केलेल्या बयाणा रकमेवर कोणतेही व्याज रा.प.महामंडळाकडून देय राहणार नाही. अयशस्वी निविदाकाराची बयाणा रक्कम यशस्वी निविदाकार निश्चित झाल्यानंतर ३० दिवसांत परत करण्यात येईल.

१६. सुरक्षा अनामत रक्कम, निविदाकाराने सादर केलेल्या मासिक परवानाशुल्काच्या ०९ पट राहील. सुरक्षा अनामत रकमेवर व्याज देय राहणार नाही.

१७. सुरक्षा अनामत रकम परवानाकालावधी संपुष्टात आल्यानंतर ०६ महिन्यानंतर परत करण्यात येईल.

१८. निविदाकाराने सादर केलेली निविदा विनाअट असणे आवश्यक आहे. निविदा सादर करताना निविदाकारांने कोणत्याही अटीचा अंतर्भाव केल्यास, सदरची निविदा रद्द करण्यात येईल.

१९. उच्चतम निविदाकारासोबत वाटाघाटी करुन देकारवाढीसाठी प्रयत्न करण्याचे अधिकार महामंडळ राखून ठेवत आहे.

२०. निविदा विहीत वेळेत भरण्याची संपूर्ण जबाबदारी निविदाकाराची राहील.

२१. यशस्वी निविदाकारास नियुक्तीपत्र दिल्यानंतर निविदाकाराने कमाल २० दिवसांमध्ये निविदा स्विकृतीपत्र व त्यासोबत ०३ महिन्यांचे आगाऊ मासिक परवानाशुल्काचा भरणा, सुरक्षा अनामत रकमेचा भरणा रा.प.महामंडळास करणे बंधनकारक राहील. तद्नंतर १० दिवसांमध्ये मुद्रांकशुल्क कायद्यानुसार विहित रकमेच्या स्टॅम्प पेपरवर नोंदणीकृत करारपत्र करणे परवानाधारकावर बंधनकारक आहे. नोदणीकृत करारपत्राकरीता येणारा सर्व खर्च यशस्वी निविदाकराने करावयाचा आहे. सदरचा करारनामा विभाग नियंत्रक रा.प.सोलापूर यांच्या स्वाक्षरीने करण्यात येईल.

२२. यशस्वी निविदाकारास निवडपत्र दिल्यानंतर निविदाकाराने विहित वेळेत निविदा स्विकृतीपत्र सादर करणे आवश्यक राहील. त्यानंतर परवाना कालावधी सुरू होईल.

२३. निविदेचा वैधता कालावधी निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांकानंतर १८० दिवस राहील.

२४. सदर ई-निविदेच्या अनुषंगाने सर्व इच्छूक निविदाकारांनी आपल्या शंका असतील तर निविदेपुर्वी विभागीय कार्यालय सोलापूर येथे संपर्क साधावा.

२५. निविदा सादर करतेवेळी निविदेमध्ये कोणतीही खाडाखोड नसावी.

२६. नैसर्गिक आपत्कालिन परिस्थितीत मुदतवाढ देण्याचे अधिकार विभाग नियंत्रक रा.प.सोलापूर यांना राहतील.

२७. भविष्यामध्ये कोणत्याही कारणास्तव सदर जागेचा ताबा महामंडळास हवा असल्यास, जागेचा ताबा विनाअट / विनासबब महामंडळास देण्याचे बंधन परवानाधारकावर राहील. यशस्वी निविदाकारास उपलब्ध करून देण्यात येणा-या जागेमुळे प्रवाशांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याची दक्षता घेणे बंधनकारक राहील.

२८. निविदा सादर करताना सर्व कागदपत्रे मराठी भाषेमध्येच सादर करावीत. इतर भाषेतील कागदपत्रे आवश्यकतेनुसार मराठीमध्ये भाषांतर करून दयावी लागतील.

विभाग नियंत्रक
रा.प.सोलापूर



Signature Not Verified
Digitally signed by PARASHURAM RAMACHANDRA NAKATE
Date: 2026.04.28 16:40:44 IST
Location: Maharashtra-MH

Scanned with OKEN Scanner